REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# बालकवी : मराठी साहित्यातील तेजस्वी तारा



डॉ. शरद जे. मेश्राम
एस.एस. जायस्वाल महाविद्यालय , अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया.

## प्रस्तावना :

२०१८....बालकवींचे स्मृतिशताब्दी वर्ष. दि. ५ मे १९१८ ला बालकवी यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले. त्यावेळी ते केवळ २८ वर्षांचे होते. आपल्या या अल्पायुष्यामध्ये बालकवींनी लिहिलेल्या कवितांना मराठी साहित्यामध्ये तोड नाही. त्यांच्या कविता कमालीच्या लोकप्रिय असल्याचे दिसते. त्यांच्या निसर्ग कविता एकाहून एक अशा सरस आहेत. निसर्गाशी एकरूप होऊन त्यांनी काव्यलेखन केले हे त्यांच्या कविता वाचल्यावर बरोबर लक्षात येते. जोपर्यंत मराठी साहित्य आहे तोपर्यंत बालकवींच्या कवितांची लोकप्रियता ही कधी कमी होणार नाही. त्यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त विनम्र अभिवादन.

## बालकवी : मराठी साहित्यातील तेजस्वी तारा

बालकवी....मराठी सारस्वताला पहाटेच्या साखरझोपेत पडलेले गोड स्वप्न. बालकवीचे नाव घेताबरोबर आपल्या डोळ्यासमोर उभी राहते निरागस, कोमल, हिरव्या मखमालीवर इकडे तिकडे उड्या मारणारी, इवलीशी फुलराणी, दरीदरीतून, पर्वतांवरून वळसे घेत, लपत छपत पळणारा निर्मळ निर्झर, आपल्या आगमनाने पूर्वेला लालिमा पसरविणारा, शुभ्र ढगांमध्ये विविध रंगांची उधळण करीत येणारा अरूण, संध्या समयी जाताना देखील आपल्या प्रेमाने पृथ्वीला हर्षनिर्भर करून गेल्यावर येणारी संध्या रजनी इ. कितीतरी निसर्ग चित्रे आपल्यापुढे उभी राहतात. आपल्याला प्रत्यक्ष दिसू लागतात.

निसर्गामध्ये आपल्या अप्रतिम कल्पनाशक्तीने प्राण ओतणारा, खरी रंगपल्लवी भरणारा, निसर्गाचे अस्सल रूप आपल्या काव्यात साकारणारा एक प्रतिभावंत शिल्पकार म्हणजे बालकवी. बालकवींची निसर्गकाव्ये वाचताना आपण ती प्रत्यक्ष अनुभवतो. त्यांची निसर्गकाव्ये वाचतांना आपण एखादे निसर्गचित्रच न्याहाळीत आहोत की काय असे मनाला वाटल्यावाचून राहत नाही.

## बालकवींविषयी थोडेसे....

बालकवींचे पूर्ण नाव त्र्यंबक बापूजी ठोंबरे होते. त्यांचा जन्म दि. १३ ऑगस्ट १८९० ला खानदेशातील धरणगाव येथे झाला. एरंडोल, यावल, जामनेर, बेटावद इ. ठिकाणी वडिलांच्या फिरत्यांमुळे त्यांचे बालपण गेले. १९०० मध्ये मराठी पाचवीत त्यांनी प्रवेश घेतला. बालवक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेऊन मोरोपंतांच्या काव्यावर त्यांनी भाषण दिले. त्यांना वाचनाची आवड होती. निबंधमालेचे वाचन त्यांनी सुरू केले.१९०३ मध्ये नवापूर येथे 'वनमुकुंद' नावाची पहिली कविता लिहीली. पुढे १९०६ मध्ये उत्तर भारताचा त्यांनी प्रवास केला. एरंडोल येथून निघणाऱ्या 'दशकाल वर्तमान' साप्ताहिकात 'मुलांस उपदेश' नावाची कविता प्रसिद्ध झाली. १९०७ साली जळगावमध्ये 'पहिले मराठी कविता संमेलन' भरले होते. त्यावेळी बालकवींनी आपल्या काही कविता तेथे सादर केल्या. त्यांच्या कविता सर्वांनाच अतिशय आवडल्या होत्या.त्याचवेळी संमेलनाध्यक्ष डॉ. का. र. कीर्तिकर यांच्याकडून 'बालकवी' म्हणून श्रीफळ व उपरणे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. याच संमेलनात रेव्ह. ना. वा. टिळक यांच्याशी त्यांची मैत्री झाली. १९०९ मध्ये त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनी काही दिवसांनी 'असोदे' येथील श्री. वि.भा. जोशी यांची कन्या पार्वती हिच्याशी त्यांचा विवाह झाला. पुढे त्यांनी आपला इंग्रजीचा अभ्यास वाढविला. याच काळात 'आनंदी आनंद' ही गोड कविता लिहीली. अनेक साप्ताहिकातून त्यांच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. यामुळे बालकवी अल्पावधीतच सर्वांच्या नजरेत भरले. पुढील वर्षी म्हणजे १९१० मध्ये बालकवी अहमदनगरला ना.वा. टिळकांच्या घरी वास्तव्यास आले. त्यावेळी तिथेच त्यांनी इंग्रजी पाचवीत प्रवेश घेतला. डॉ. कीर्तिकर यांच्याकडून दरमहा दहा रूपये शिष्यवृत्ती त्यांना मिळत होती. पुढे गोविंदाग्रजांशी त्यांची ओळख झाली. ते 'तुतारी' मंडळाचे सदस्य झाले. तिथेच टिळकांच्या'वनवासी फूल' या कवितेवर त्यांचे प्रवचन झाले. ते टिळकांना खुप आवडले.

१९१२ मध्ये 'केसरी' मधून 'काव्यकलाप' नावाचे अर्वाचीन कवितेचे सदर त्यांनी चालविले. सोबतच 'कलापि' या शीर्षकात त्यांनी विविध काव्य प्रकाशित केले. याचकाळात निर्झरास, फुलराणी या सुंदर कविता लिहिल्या. पुढे अहमदनगरच्या मिशन स्कूलमध्ये, महाबळेश्वर येथील ख्रिस्ती मिशनरीच्या शाळेत, एस.पी. जी. मिशन ट्रेनिंग स्कूलमध्ये अशा विविध शाळेत त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. १९१६ मध्ये 'रजनीस आवाहन' ही कविता लिहीली. याचवर्षी लॅग्वेज स्कूलमध्ये हेडमास्तर म्हणून त्यांची नेमणूक झाली. तिथेही ते जास्त दिवस राहू शकले नाही आणि १९१७ मध्ये पुन्हा नगरात मिशन स्कूलमध्ये शिक्षक म्हणून रूजू झाले. त्यानंतर दि. ५ मे १९१८ ला भादली – नसिराबाद रेल्वे स्टेशनजवळ रूळ ओलांडताना त्यांना अपघात झाला. बालकवींच्या मृत्यविषयी पार्वतीबाई सांगतात, ''बालकवींचा अंत रेल्वेच्या चालत्या इंजिनाखाली सापडून झाला, ते रेल्वेचे रूळ ओलांडीत होते. तंद्रित होते,चालताना त्यांच्या पायतला जोडा रूळाजवळच्या तारेत अडकला त्यामुळे बालकवी रूळावर पडले आणि मागे येणारं इंजीन त्यांच्या अंगावरून गेलं. रक्ताचं थारोळं साचलं...''

## बालकवींची निसर्ग काव्ये

बालकवींनी भरपूर काव्यलेखन केले आहे. पण त्यांच्या इतर कवितांपेक्षा त्यांच्या निसर्ग कविता ह्या अतिशय प्रसिद्ध झाल्या.एक निसर्ग कवी म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. कवीच्या जीवनात जसे सुख दु:खाचे अनुभव येत असतात, तशीच त्यांची कविता निर्माण होत असते. कवी आनंदाचे, सुखाचे क्षण ज्या प्रमाणे काव्यात चित्रित करतो त्याच प्रमाणे मनातील हुरहूर, उदासीनता, औदासिन्यही तो व्यक्त करीत असतो. या दोन्ही दृष्टीने बालकवींच्या कवितेतून त्यांची विलक्षण प्रतिभाशक्ती आपल्याला दिसून येते.

बालकवींना स्वत:च्या जीवनात जो आनंद व जे प्रेम मिळाले नाही, त्याची प्राप्ती करून घेण्यासाठी त्यांनी निसर्गाकडे धाव घेतली. त्यासाठी त्यांनी आपल्या सभोवतालच्या क्षुद्र, दु:खद, सौंदर्यहीन अशा मानवी जगाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आणि निसर्गाशी ते एकरूपझाले. निसर्गामध्ये असलेली अलौकिक दिव्य शांती, मानसिक समाधान, मानवी जगात त्यांना लाभले नाही आणि म्हणूनच निसर्गाशी एकरूप होऊन तेथील निर्मळ आनंद, शांती यांची प्राप्ती करून घेतली. निसर्गातील शांतता कवीच्या मनात निर्माण झाली व या सौंदर्यशून्य, व्यावहारिक जगामध्ये न लाभू शकणारे मानसिक स्वास्थ्य, समाधान त्यांना निसर्गामध्ये सापडले आणि यातूनच निर्माण झाली बालकवींची निसर्ग कविता...

बालकवींनी निसर्ग कविता लिहितांना निसर्गातील वस्तू वस्तूंवर मानवी भाव भावनांचा आरोप केलेला आहे. निसर्गातील अलौकिक सौंदर्य मानवी भाव भावनांच्या माध्यमातून त्यांनी प्रकट केले आहे. म्हणूनच त्यांना हिरव्या गवतावर उमललेली एक कलिका म्हणजे विवाहोत्सुक फुलराणी वाटते. तिचा प्रियकर हा सोनेरी रविकर दिसतो. लालिमा पसरलेली पश्चिम दिशा ही प्रेयसी ठरते तर नभात विविध रंग पसरविणारा अरूण हा तिचा प्रियकर ठरतो. आकाशात निर्माण होणाऱ्या चांदण्या या जणू मुग्ध बालिका वाटतात, अशा विविध कल्पना बालकवी योजतात.

साध्याभोळ्या फुलराणीचं सोनेरी रविकिरणावरील प्रेम जेव्हा खट्याळ वाऱ्याला माहीत होते तेव्हा तो तिची खोड काढतो,

''छानी माझी सोनुकली ती
कुणाकडे गं पाहत होती
कोण बरे त्या संध्येतून
हळूच पाहतो डोकावून
तो रविकर का गोजिरवाणा
आवडला अमुच्या राणींना
लाज लाजली या वचनांनी
साधी भोळी ती फुलराणी ''

असे अप्रतिम वर्णन बालकवी करतात.

'संध्यारजनी' या कवितेमध्ये प्रियकर सूर्य हा माळवतीला जाताना आपल्या प्रेयसीचे, पश्चिमेचे एक साखरचुंबन घेतो तेव्हा पश्चिमेच्या गालावर लालिमा पसरते.

''लाजलाजुनी जीव सतीचा मग अर्धा झाला
त्यातच आल्या रोषाच्याही लहरी गालाला !''

सूर्य गेल्यानंतरही कितीतरी काळ पश्चिमेची मोहिनी उतरत नाही. ती त्याच्या प्रेमरंगात अजूनही भिनलेलीच असते.

''थक्क होऊनी दिशा म्हणाल्या 'काय मोहिनी ही
प्रेमसमाधी अजुनि खुळीची या उतरत नाही !''

इतकं जिवंत चित्रण बालकवींच्या काव्यात दिसून येते.

एवढेच नव्हे तर पहाटेच्या वेळी आकाशात येणारी लाली कशाची आहे हे सांगताना ते म्हणतात,

''स्वर्गीच्या अप्सराच अथवा गगन मंडलात
रात्रीला शेवटची मंगल गीते गातात?
किंवा ' माझी चोरूनि नेली मोत्यांची माला
म्हणुनि नभःश्री रूसली आली लाली गालाला!''

तारका या जणू स्वर्गातील अप्सराच ठरतात आणि सूर्याच्या आगमनाने या तारका जेव्हा निघून जातात तेव्हा माझी मोत्यांची माळ चोरून नेली म्हणून आकाशाला राग येतो. ही लाली रागाची असते.

बालकवींच्या निसर्ग काव्यात आणखी एक गोष्ट आढळते ती अशी की, बालकवींनी ज्या प्रमाणे निसर्गावर मानवी भाव भावनांचे प्रत्यारोपण करून निसर्ग काव्याची निर्मिती केलेली आहे, त्याचप्रमाणे मानवी भाव भावनांचे आरोपण न करता सुद्धा काही अप्रतिम अशी निसर्ग चित्रे साकारली आहेत. 'श्रावणमास' या कवितेत कवी म्हणतात,

'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे,
क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनि ऊन पडे'

ही अतिशय सुंदर अशी निसर्ग कविता आहे. यात बालकवींनी श्रावणाचे वर्णन ओतप्रोत भरलेले आहे. इंद्रधनुष्य म्हणजे आकाशरूपी मंडपाला तोरण बांधले की काय असे वाटते. आकाशात उडणाऱ्या बगळ्यांची रांग म्हणजे रूपेरी माळच वाटते. त्याचप्रमाणे आपल्या भिजलेल्या पंखांची फडफड करणारे पक्षी, आपल्या बाळांसह बागडणाऱ्या हरिणी, खिल्लारे राखणारा गोपी, त्याच्या बासरीतून श्रावणाचा महिमा गाणारे गीत, सोबतच शेवटच्या ओळीत,

''देवदर्शना निघती ललना
हर्ष माईना हृदयात
वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे
श्रावण महिन्याचे गीत''

इ. अतिशय बारीकसारीक वर्णन बालकवींनी केले आहे. त्यांचा श्रावण वाचताना आपल्याला थोडा गारवा जाणवतो. क्षणातच ऊन आणि क्षणातच पाऊस येतो की काय असेही वाटून जाते. या श्रावणमासातून श्रावणाचे आगळेवेगळे दर्शन घडविण्यात बालकवी यशस्वी झाले आहेत.

अशीच आणखी एक साजिवंत कविता म्हणजे 'निर्झरास'.
'गिरीशिखरे, वनमालाही— दरीदरी घुमवित येई!
कड्यावरून घेऊन उड्या — खेळ लता वलयी फुगड्या''

हा निर्झर मन मानेल तसा जिकडे तिकडे खेळतो आहे, बागडतो आहे. पर्वतावरून, शिखरांवरून, झाडा झुडूपांमधून, लता वेलींमधून, पाचूच्या हिरव्या शेताजवळून तो फिरतो आहे. हा निर्झर म्हणजे स्वर्ग धरेवर नृत्य करणारी शुभ्र चंद्रिका आहे असे कवीला

वाटते. हा निर्झर म्हणजे बालगुणी असलेला बाल झरा वाटतो. तो प्रत्यक्ष बाल वसंतच वाटतो. तो खरा गुणी असलेला कवीराज वाटतो. निर्झराचे झुळझुळ गाणे मनाला आल्हादित करीत आहे व म्हणूनच शेवटी कवी निर्झराला म्हणतात,

'शिकवी रे शिकवी माते
दिव्य तुझी असली गीते'

असे हे निर्झराचे मंजूळ आणि नैसर्गिक गाणे कवीलाही शिकावेसे वाटत आहे.

एवढीच सरस आणि महत्त्वपूर्ण कविता म्हणजे बालकवींचा 'औदुंबर'. अवघ्या आठ कुंचल्यांच्या चौरेचाळीस फटकाऱ्यात साकारलेले अजरामर असे निसर्ग चित्र.

'ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळा सावळा झरा वाहतो बेटा बेटातून...'

कवितेची प्रत्येक ओळ आपले वेगळं महत्त्व पटवून देत आहे असे वाटते. चार घरांचे चिमुकले गाव, बाजूलाच हिरवे शेत, शेतातून काळ्या डोहाकडे आडवी तिडवी जाणारी पायवाट, इ. अतिशय सुरेख असे वर्णन बालकवींनी केले आहे. आणि शेवटी...

'झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर'

असे कवी म्हणतात. यात 'असला' म्हणजे नेमके कसला याचा आपल्याला काहीच अंदाज लागत नाही. हे एक मोठे गूढ आहे. मर्ढेकरांच्या पिपात मेलेल्या उंदराप्रमाणे, किंवा मोनालिसाच्या गूढस्मिताप्रमाणे बालकवींचा 'असला' औदुंबर अनेक गूढ कायम ठेवून जातो.

### संदर्भ–

१ फुलराणी – संपा. कुसुमाग्रज
२. लोकराज्य बालकवी जन्मशताब्दी विशेषांक (१९९०)